# भारत सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणाची आवश्यकता

**डॉ. मृणालिनी नरेन्द्र तापस**
अर्थशास्त्र विभागप्रमुख
श्रीनिकेतन आर्ट्स कॉमर्स कॉलेज
नागपूर

---

**प्रस्तावना :—**

शिक्षण हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे साधन आहे. मानवी जीवनातील शिक्षणाचे स्थान अनन्य साधारण आहे. शिक्षण हे मानवाच्या विचारांना प्रगल्भ बनविते, तसेच समाजातील प्रत्येक व्यक्तीला जगण्यासाठी दिशा दर्शविते. आत्मनिर्भर भारत बनविण्याच्या दृष्टीने शिक्षणाची भूमिका अतिशय महत्वपूर्ण आहे. २१ व्या शतकातील हे पहिले शैक्षणिक धोरण असून ३४ वर्ष जुन्या १९८६ च्या शिक्षणावरच्या राष्ट्रीय धोरणाची जागा नवे धोरण घेणार आहे. २९ जुलै २०२० रोजी विद्यमान भारतीय पध्दतीत अनेक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने मंत्रीमंडळाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मान्यता दिली. हे धोरण २०२२ पासून लागू होणार आहे. शालेय व उच्चशिक्षणात मोठया प्रमाणात परिवर्तनात्मक सुधारणांना यात मोठा वाव देण्यात आला आहे. सर्वांना संधी, नि:पक्षपात, दर्जेदार, परवडणारे, आणि उत्तरदायीत्व या स्तंभावर या धोरणाची उभारणी केली आहे. २०३० च्या शाश्वत विकास कार्यक्रमाशी याची सांगड घालण्यात आली आहे. शालेय व उच्चशिक्षणात अधिक समग्र, बहुशाखीय, २१ व्या शतकाच्या गरजांना अनुरूप करत भारताच चैतन्यशील प्रज्ञावंत समाज आणि जागतीक ज्ञान महासत्ता म्हणून परिवर्तन घडविण्याचा आणि प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आगळया क्षमतापुढे आणण्याचा या धोरणाचा उद्देश आहे.

**नवीन शैक्षणिक धोरणाची पार्श्वभूमी :—**

भारतीय राज्यघटनेच्या राज्य धोरणाची दिशादर्शक तत्वाच्या भाग ४, कलम ४५ आणि ३९ ( एफ मध्ये सर्वांना न्याय व प्रवेश देणे ही योग्य शिक्षणाची तरतुद आहे. २०१५ मध्ये स्मृती इराणी मनुष्यबळ विकास मंत्री होत्या. त्यांनी नव्या शैक्षणिक सुधारणा मान्य करण्याच्या दृष्टीकोनातून ऑक्टोबर २०१६ मध्ये धोरण मांडले. यावर जनतेकडून सुधारणा मागविण्यात आल्या. मात्र या धोरणाच्या निर्मीतीचे कार्य प्रमुख टी. एस. आर. सुब्रमण्यम हे होते. व दुसरा प्रयत्न इस्त्रोचे माजी प्रमुख के. कस्तुरीरंगन याच्या अध्यक्षतेखाली ९ समितीय सदस्यांनी नव्या धोरणाचा मसुदा तयार केला आहे. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतातील शिक्षण प्रणालीतील हा तिसरा मोठा बदल आहे. एनईपी २०२० च्या पूर्वी १९६८ व १९८६ मध्ये शैक्षणिक यंत्रणेत सुधारणा झाली. शालेय व उच्च शिक्षणातील गुंतवणुकीमध्ये लक्षणीय वाढ करणे, नवनवीन उपक्रम राबविणे. या द्वारे भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनविणे शक्य होईल.

**२०२० शैक्षणिक धोरणातील महत्वाचे मुद्दे :—**

शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरावर सार्वत्रिक प्रवेश सुनिश्चित करीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शालेय पुर्व ते माध्यमिक अशा सर्व स्तरावर शालेय शिक्षणाला सार्वत्रिक संधी सुनिश्चित करण्यावर भर देण्यात आले आहे. पायाभुत सुविधा सहाय्य, शाळाबाहय मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कल्पक

शिक्षण केंद्रे, विद्यार्थी आणि त्यांच्या अध्ययन स्तराचा मागोवा औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण पध्दतीसह शिक्षणाचे अनेक मार्ग सुलभ करणे, शाळासमवेत समुपदेशक किंवा उत्तम प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्त्यांची सांगड, एन. आय. ओ. एस. आणि राज्यातल्या मुक्त शाळा याद्वारे ३,५,८ या इयत्तेसाठी खुले शिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम, प्रौढ साक्षरता, आणि जीवन समृद्ध करणारे कार्यक्रम, या मार्गाने हे उद्दिष्ट साध्य करण्यात येणार आहे. या धोरणांतर्गत सुमारे २ कोटी शाळाबाहय मुले मुख्य प्रवाहात आणली जाणार आहेत. राष्ट्रीय शिक्षण आयोगाची स्थापना करण्याची आणि खासगी शाळांना अनियंत्रित फी वाढविण्यापासून रोखण्याची शिफारस नवीन शैक्षणिक धोरणात करण्यात आलेली आहे. शिक्षणाचा आकृतिबंध बदलण्यात आला आहे. हे धोरण बालवाडी, अंगणवाडीपासून ते उच्चशिक्षणामध्ये लागू होणार आहे.

**नवा अभ्यासक्रम आणि शैक्षणिक आराखडयासह बालवयाच्या सुरूवातीलाच काळजी आणि शिक्षण**

बालवयाच्या सुरूवातीलाच काळजी आणि शिक्षण यावर भर देत १०+२ या शालेय बंधाची जागा आता ५+३+३+४ अभ्यासक्रम आराखडा आता ३—८, ८—११, ११—१४, १४—१८ या वयोगटासाठी राहील. यामुळे ३—६ वर्षापर्यंतच्या बालकांचा समावेश आतापर्यंत केला नाही. परंतु या धोरणाअंतर्गत हा वयोगट शालेय अभ्यासक्रमाअंतर्गत येईल. जगभरात हा वयोगट बालकांच्या मानसिक जडणघडणीच्या विकासासाठी अतिशय महत्वाचा मानला जातो. नव्या पध्दतीत तीन वर्षे आंगणवाडी /शाळा पुर्व वर्गासह १२ वर्ष शाळा राहणार आहे.

बालवयाच्या सुरूवातीलाच काळजी आणि शिक्षण यासाठी ८ वर्षापर्यंतच्या बालकासाठी राष्ट्रीय कार्यक्रम शैक्षणिक आराखडा विकसित करणार आहे. आंगणवाडी आणि पुर्व शालेय सह विस्तृत आणि बळकट संस्थाच्या माध्यमातुन ईसीसीई देण्यात येईल. ईसीसीई या अभ्यासक्रमात प्रशिक्षित शिक्षक आणि आंगणवाडी कार्यकर्ते यांचा समावेश केला जाईल. या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी मनुष्य बळ विकास महिला आणि बाल विकास मंत्रालय, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, आदिवासी विकास मंत्रालयाद्वारे केली जाईल.

**पायाभुत साक्षरता आणि संख्याशिक्षण साध्य करणे :—**

पायाभुत साक्षरता आणि संख्या शिक्षणही शिक्षणाची पुर्व अट आहे. हे जाणून राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये एम. एच. आर.डी.कडून पायाभुत साक्षरता आणि संख्या शिक्षण राष्ट्रीय मिशन स्थापन करण्याचे आवाहन करण्यात आले. सर्व प्राथमिक शाळेत सार्वत्रिक पायाभुत साक्षरता आणि संख्या शिक्षण साध्य करण्यासाठी राज्ये अंमलबजावणी आराखडा तयार करतील.

**शालेय अभ्यासक्रम आणि शिकविण्याच्या पद्धतीत सुधारणा :—**

२१ व्या शतकाची प्रमुख कौशल्य, आवश्यक शिक्षण आणि चिकित्सात्मक विचार वाढविण्यासाठी अभ्यासक्रम कमी करणे, आणि अनुभवातून शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रीत करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे. हा शालेय अभ्यासक्रम आणि शिकविण्याच्या पध्दतीचा विकास करण्याचा उद्देश आहे, विद्यार्थ्यांसाठी विषयाचे पर्याय वाढतील. कला, विज्ञान अभ्यासक्रम आणि अवांतर उपक्रम तसेच व्यावसायिक आणि शैक्षणिक शाखा यांच्यात कुठल्याही प्रकारचे विभाजन केल्या जाणार

नाही. शाळांमध्ये व्यावसायिक शिक्षण ६ वी पासून सुरू होईल. त्यात इंटर्नशिपचा समावेश असेल. एनसीईआरटीद्वारे एक नवीन सर्वसमावेशक राष्ट्रीय शालेय शिक्षण अभ्यासक्रम विकसित केला जाईल.

**नव्या शैक्षणिक धोरणांमध्ये भाषांचा समावेश :–**

या धोरणांमध्ये किमान इयत्ता ५वी, ८वी तसेच त्यानंतरही मातृभाषा, स्थानिक भाषा, प्रादेशिक भाषा हे शिकविण्याचे माध्यम असावे, यावर भर देण्यात आला. शालेय व उच्चशिक्षणाच्या सर्व स्तरावर विद्यार्थ्यांना जीन भाषांच्या सुत्रासह संस्कृतचाही एक पर्याय दिला जाईल. भारतातील इतर भाषासाहित्य देखील पर्याय म्हणून उपलब्ध असतील. एक भारत श्रेष्ठ भारत या उपक्रमांतर्गत इयत्ता ६–८ साठी भारताच्या भाषाविषयावरील मजेदार प्रकल्प/उपक्रमात विद्यार्थी सहभागी होतील. माध्यमिक स्तरावर विविध परदेशी भाषांचा पर्याय देखील दिला जाईल. दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता वापरण्यासाठी भारतीय सांकेतिक भाषा संपूर्ण देशभरात प्रमाणीत केली जाईल आणि राष्ट्रीय आणि राज्य अभ्यासक्रम सामुग्री विकसित केली जाईल. कुठल्याही विद्यार्थ्यांवर कोणत्याही भाषा लादली जाणार नाही.

**न्याय्य आणि सर्वसमावेशक शिक्षण :–**

जन्माच्या वेळेची परिस्थिती किंवा अन्य पार्श्वभूमीमुळे कोणताही मुलगा शिकण्याची आणि उत्कृष्टतेची संधी गमावणार नाही हे एनईपी २०२० चे उद्दिष्ट आहे. लिंग, सामाजिक–सांस्कृतिक, भौगोलिक ओळख आणि अपंगत्व समाविष्ट असलेल्या सामाजिक व आर्थिक दृष्टया वंचित गटावर विशेष भर दिला जाईल. यामध्ये लिंग समावेश निधी आणि वंचित प्रदेश गटासाठी विशेष शैक्षणिक क्षेत्र स्थापन करण्याचा समावेश आहे. दिव्यांग मुले प्रशिक्षण, संसाधन केंद्र , राहण्याची सुविधा, सहाय्यक उपकरणे, योग्य तंत्रज्ञान, आधारित साधने आणि त्यांच्या गरजानुसार तयार करण्यात आलेल्या अन्य साहाय्यक साधनांच्या मदतीने पूर्व प्राथमिक टप्प्यापासून उच्च शिक्षणापर्यंतच्या नियमित शालेय शिक्षण प्रक्रियेत पूर्णपणे भाग घेण्यास सक्षम असतील. प्रत्येक राज्य किंवा जिल्हयात कला संबधित, करिअरशी संबधित, आणि खेळाशी संबधित उपक्रमांमध्ये भाग घेण्यासाठी एक खासडे –टाईम बोर्डिंग स्कूल म्हणून बालभवन्स स्थापन करायला प्रोत्साहित केले जाईल. सामाजिक चेतना केंद्रे म्हणून मोफत शालेय पायाभूत सुविधा वापरता येतील.

**शिक्षकांचीभरती व करिअरमार्ग:–**

शिक्षकांची भरती सक्षम पारदर्शक प्रक्रियेद्वारे केली जाईल. बढती गुणवत्तेवर आधारित असेल ज्यामध्ये बहुस्त्रोत नियमित कामगिरीचे मूल्यांकन आणि उपलब्ध प्रगतीचे मार्ग याद्वारे शैक्षणिक प्रशासक किंवा शिक्षक होता येईल. एनसीईआरटी, एससीईआरटी, आणि विविध पातळी व प्रदेशातील तज्ज्ञ संघटना यांच्याशी विचारविनीमय करून राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद २०२२ पर्यंत विकसित करू शकेल.

**उच्चशिक्षण:–**

देशात किमान शिक्षणाचा टक्का वाढत असला तरीही गुणवत्तेच्या बाबतीत काही प्रमाणात प्रश्नचिन्ह आहे. सुमारे ४०,००० कॉलेज व आठशे पेक्षा जास्त विद्यापिठे आहेत. परंतु विद्याथी नाव नोंदणीमध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या तुलनेत उच्च शिक्षणाचे प्रमाण २०१८ मध्ये २६.३ टक्के असून आता नव्या शैक्षणिक धोरणात हे प्रमाण ५० टक्के वाढविणार आहे. महिलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देऊन, गरीब व श्रीमंत यातील विषमता ही नवीन शैक्षणिक धोरणात विचारात घेऊन सरकारी व खासगी

शाळेत व महाविद्यालयीन शिक्षणात समानता आणायची भूमिका प्रामुख्याने मांडण्यात आली आहे. व्यावसायीक शिक्षणासह उच्च शिक्षणाच्या संदर्भात सकल नोंदणी गुणोत्तर २६.३ टक्के २०१८ वरून २०३५ पर्यंत जीईआर ५० टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे एनईपी २०२० चे उद्दिष्ट आहे. उच्च शिक्षण संस्थामध्ये ३.५ कोटी नवीन जागा वाढविण्यात येतील.

**समग्रबहुशाखीय शिक्षण :—**

या धोरणात व्यापक आधारभूत बहु—शाखीय लवचिक अभ्यासक्रमासह सर्वसमावेशक पदवी शिक्षण अभ्यासक्रम, विषयाचे सर्जनशील संयोजन व्यावसायिक शिक्षणाचे एकात्मीकरण आणि योग्य प्रमाणीकरणासह बहुप्रवेश आणि निर्गम टप्यांची कल्पना केली आहे. पदवी शिक्षण ३ किंवा ४ वर्षाचे असू शकते. आणि या कालावधीत निर्गमन पर्याय आणि योग्य प्रमाणीकरण असू शकते. उदाहरणार्थ १ वर्षानंतर प्रमाणपत्र, २ वर्षानंतर प्रगत पदविका, ३ वर्षानंतर बॅचलर डिग्री ४ वर्षानंतर बॅचलर विथ रिसर्च वेगवेगळया उच्च शिक्षण संस्थांकडून मिळविलेल्या शैक्षणिक उपलब्धी डिजिटली संग्रहीत करण्यासाठी ॲकेडमिक बॅक ऑफ क्रेडिटची स्थापना केली जाईल. जेणे करून माहिती हस्तांतरीत करता येईल आणि अंतिम पदवी मिळविल्यावर त्याची गणना केली जाईल. तसेच नॅशनल रिसर्च फाऊंडेशनची स्थापना केली जाईल. या सर्वोच्च संस्थेच्या माध्यमातून प्रबळ संशोधन संस्कृती आणि उच्च शिक्षणामध्ये संशोधन क्षमता वृध्दींगत करण्यात येईल.

**नियम :—**

भारतीय उच्च शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात येईल. वैद्यकीय आणि कायदेशीर शिक्षण वगळता उच्च शिक्षणाशी संबधीत एकमेव उच्च संस्था असेल. राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषद दर्जात्मक व्यवस्थेसाठी जनरल एज्युकेशन कौन्सील निधीसाठी उच्च शिक्षण अनुदान परिषद आणि मूल्यांकनासाठी राष्ट्रीय मूल्यांकन परिषद असेल. जी उच्च शैक्षणिक संस्था नियम आणि मानदंडाचे पालन करणार नाही, त्यांना दंड करण्याचा अधिकार एचईआयसी ला असेल. सार्वजनिक आणि खाजगी उच्च शिक्षण संस्था याचे नियम, मूल्यांकन, आणि शैक्षणिक मानदंडाद्वारे संचालित केल्या जाईल.

**तर्कसंगत संस्थात्मक संरचना :—**

उच्च शैक्षणिक संस्थांचे रूपांतर विशाल उत्तम स्त्रोत असलेल्या सळसळत्या बहु विषयी संस्थांमध्ये केले जाईल. यात उच्च गुणवत्तेचे शिक्षण, संशोधन आणि समुदाय प्रतिबध्दता असेल. संशोधन केंद्रीत विद्यापिठे, शिक्षण केंद्रीत विद्यापिठे, स्वायत्त पदवी देणारे महाविद्यालये असा विस्तार होईल. महाविद्यालयांची संलग्नता १५ वर्षात टप्याटप्याने समाप्त केली जाणार आहे. महाविद्यालयांना पातळी आधारित यंत्रणेच्या माध्यमातून श्रेणीबध्द स्वायत्तता देण्यात येईल. कालांतराने प्रत्येक महाविद्यालय एक तर स्वायत्त पदवी देणारे महाविद्यालय किंवा विद्यापीठाचे म्हणून विकसित होईल.

**प्रेरीत, उत्साही आणि सक्षम अध्यापक :—**

एनईपी ने प्रेरीत, उत्साही आणि क्षमता निर्माण करणाऱ्या अध्यापकांच्या नियुक्तीसाठी स्पष्टपणे परिभाषित स्वतंत्र पारदर्शी पध्दतीने नियुक्त करण्याची शिफारस केली आहे. अभ्यासक्रम /अध्यापनाचे

स्वातंत्र्य, उत्कृष्टतेला उत्तेजन देणे, संस्थात्मक नेतृत्वाला मदत केली जाईल. मुलभूत निकषांप्रमाणे काम न करणाऱ्या अध्यापकांना जबाबदार ठरविले जाईल.

**मार्गदर्शक मोहीम :—**

एकाराष्ट्रीय मार्गदर्शक मोहीमेची स्थापना करण्यात येईल. यातउत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या जेष्ठ/निवृत्त अध्यापकांचा समावेश असेल. भारतीय भाषा शिकविणाऱ्या शिक्षकांचा तसेच थोडया /दीर्घकाळासाठी मार्गदर्शक म्हणून विद्यापीठांना/महाविद्यालयांना शिक्षक मदत करतील त्यांचा यात समावेश होईल.

**विद्यार्थ्यांना आर्थिक मदत :—**

एस. सी., एस.टी, ओबीसी आणि एसईजीडी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेस प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न केले जातील. राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलचा विस्तार करून शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला जाईल. खासगी संस्थांना देखील मोठया प्रमाणावर शिष्यवृत्ती देण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

**आधुनिक शिक्षण प्रणाली :—**

सध्या संपूर्ण देशामध्ये कोव्हीड—१९ मुळे झालेला प्रसार लक्षात घेऊन शिक्षण धोरण तयार करतांना पर्यायी शैक्षणिक पध्दतीचा व्यापक विचार करण्यात आला आहे. ऑनलाईन कोर्सेस, डिजीटल कोश, संशोधनासाठी निधी, सुधारीत विद्यार्थी सेवा विशाल मुक्त ऑनलाईन कोर्सेची पत आधारीत मान्यता इत्यादी शिक्षणाला चालना देण्यासाठी आलेल्या शिफारसी विचारात घेऊन शैक्षणिक सज्जता सुनिश्चित केली जाणार आहे. सध्याच्या महामारीच्या काळामध्ये वैयक्तिक रितीने परंपरागत पध्दतीने शिक्षण देणे शक्य नाही. त्यामुळे दर्जेदार शिक्षणासाठी पर्याय शोधण्यात आले आहेत. मनुष्यबळ विकास मंत्रालयामध्ये ई शिक्षणाच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठी शालेय आणि उच्च शिक्षणासाठी डिजीटल पायाभूत सुविधा शैक्षणिक सामग्री तयार करणारे विभाग आणि डिजीटल शिक्षणासाठी समर्पित विभाग तयार केले जातील.

**शिक्षणामध्ये तंत्रज्ञान :—**

राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच या स्वायत्त संस्थेची स्थापना करण्यात येत असून याद्वारे विचारांच्या देवाणघेवाणीसाठी एक व्यासपीठ मंच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या मंचाद्वारे शैक्षणिक मूल्यवर्धन, मूल्यांकन तसेच नियोजन, प्रशासन यासाठी स्वतंत्रपणे विचारांचे आदानप्रदान केले जाणार आहे.वर्गातील शिक्षणात सुधारणा व्हावी. शिक्षकांना व्यावसायिक शिक्षण प्राप्त व्हावे. वंचित घटकांना शैक्षणिक सुविधा जास्तीत जास्त मिळाव्यात आणि शैक्षणिक नियोजन, प्रशासन तसेच व्यवस्थापन सुनियोजित पध्दतीने व्हावे यासाठी सर्व स्तराच्या शिक्षण पध्दतीमध्ये तंत्रज्ञानाचे एकात्मीकरण केले जाईल.

**भारतीय भाषांचा प्रसार :—**

सर्व भारतीय भाषांचा प्रसार व संवर्धन व्हावे तसेच त्यांच्यामध्ये एक प्रकारे चैतन्य निर्माण व्हावे याची सुनिश्चिती करण्यात येणार आहे. यासाठी एनईपी ने दिलेल्या शिफारशीनुसार इंडियन इन्टीटयूशन ऑफ ट्रान्सलेशन अॅन्ड इंटरप्रिटेशन म्हणजेच राष्ट्रीय अनुवाद आणि भाष्य संस्था तसेच नॅशनल इंस्टिटयूट फॉर पाली, पार्शियन अॅन्ड प्राकृत साठी राष्ट्रीय संस्था स्थापन करण्याचा सल्ला देण्यात आला. संस्कृत आणि इतर भाषा विभागांच्या सुदृढीकरणाची शिफारस करण्यात आली आहे. तसेच उच्च शिक्षण संस्थामध्ये

अधिकाधिक मातृभाषेचा किंवा स्थानिक भाषेचा उपयोग शिकविण्याचे माध्यम म्हणून केला जावा असेही सुचविण्यात आले आहे. शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण संस्थात्मक सहकार्यातून करण्यात येऊ शकते. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या देवाणघेवाणीचा विचार करून करता येते. त्यामुळे आपल्या देशामध्ये जगामधल्या अव्वल क्रमांकाच्या विद्यापीठांना प्रवेशाची परवानगी देण्यात येईल. बाहेरच्या सर्वोत्कृष्ट विद्यापीठांना आपल्या देशात कॅम्पस उघडता येईल.

**व्यावसायीक शिक्षण व प्रौढशिक्षण :—**

उच्च शिक्षण प्रणालीमध्ये व्यावसायिक शिक्षण हा अनिवार्य आणि अविभाज्य भाग आहे. यात तंत्रज्ञान विद्यापीठे, आरोग्य विज्ञान विद्यापीठे, विधी कायदा आणि कृषी विद्यापीठांचा समावेश आहे. १०० टक्के तरूण आणि प्रौढ साक्षरता प्राप्त करण्याचे उद्दिष्ट या धोरणात समाविष्ट केले आहे. साक्षरता व मूलभूत शिक्षण व्यक्तिगत नागरी, आर्थिक व आजीवन अध्ययन संधीमधील व्यक्तीचा सहभाग सक्षम करते. हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. आपल्या देशात युवा व प्रौढ लोकसंख्येचा अविश्वसनीय वाटेल इतका मोठा हिस्सा अद्याप निरक्षर आहे.

**वित्त पुरवठा :—**

शैक्षणिक क्षेत्रामध्ये सार्वजनिक गुंतवणूक वृध्दीसाठी केंद्र आणि राज्य सरकार एकत्रित काम करणार आहे. यामुळे येत्या १० वर्षाच्या कालावधीत केंद्र शासन व सर्वराज्य शासने या दोघांकडून शिक्षणक्षेत्रामध्ये होणारी शासकीय गुंतवणूक २० टक्क्यापर्यंत वाढविण्याची कल्पना सदर धोरणात समाविष्ट केली आहे. सदर धोरण शैक्षणिक गुंतवणूक वाढविण्यासाठी वचनबध्द आहे. समाजाच्या भविष्याचा एकत्रितरित्या विचार करता समाजाच्या सर्वांगीण लाभासाठी शिक्षणापेक्षा अधिक उपयुक्त सुयोग्य अशी दुसरी कोणतीही गुंतवणूक अस्तित्वात नाही.

या समग्र धोरणाची चिकीत्सा करून याची अंमलबजावणीसाठी जनतेची एकजूट निर्माण करणे, आज काळाची गरज झालेली आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राध्यापक, आणि विवेकी समाज घडविण्याची जबाबदारी म्हणून आपल्याला सर्वानांच गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. कारण शिक्षणही आपल्या अस्तित्वाची लढाई आहे. हे विसरून चालणार नाही.

**संदर्भ ग्रंथ :—**

१. इंटरनेट
२. शैक्षणिक धोरण: महत्वाचे पाऊल, विशाल गांगुर्डे, महाराष्ट्र टाईम्स, तारीख, ९ ऑगष्ट २०२०
३. नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, इंटरनेट
४. शिक्षण क्षेत्राकडे अक्षम्य दुर्लक्ष, मारोती तेगमपुरे, दैनिक महाराष्ट्र टाइम्स, नागपूर ( १६/०९/२०१८ )
५. नवीन शैक्षणिक धोरण: प्रश्न आणि पर्याय, संदीप लांडगे, सकाळ, ६ ऑगस्ट २०२०
६. आत्मनिर्भर भारत आणि नवीन शैक्षणिक धोरण, प्रा. बाळकृष्ण रामटेके, रिसर्च जर्नल फार एन्टीडिसिप्लिनरीस्टडिज